# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ८७५ /२०१८.                                                    पुणे शहर, दिनांक- २५/०१/२०१८

**विषय :- महंमदवाडी,हडपसर येथील उत्सवानिमीत्त तात्पुरत्या स्वरुपात जड वाहनांना बंदी व दिनांक- २६/०१/२०१८ रोजी,पोलीस मुख्यालय,परेडग्राऊंड शिवाजीनगर येथील कार्यक्रमास येणा-या नागरीकांचे वाहन पार्कींग बाबत.**

-------------oo----------

दिनांक- २५/०१/२०१८ व २६/०१/२०१८ रोजी मौजे महंमदवाडी,हडपसर पुणे येथे ग्रामदेवतांचा उत्सव असल्याने सदर दिवशी उत्सवास महंमदवाडी गावात मोठ्याप्रमाणात नागरीक हजर राहणार आहेत त्यामुळे गावातून जाणा-या रस्त्यावरील जडवाहतूकीमुळे वाहतुक संथ होणार आहे सदर ठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊ नये,वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी,अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन मौजे महंमदवाडी,हडपसर पुणे येथे गावातून जाणा-या रस्त्यावर जड वाहनांना दिनांक- २५/०१/२०१८ व २६/०१/२०१८ रोजी सायं. १६.०० ते २४.०० वाजे पर्यंत वाहतुकीस बंदी करण्यात येत असून जड वाहनांनी सदर दिवशी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

तसेच दिनांक- २६/०१/२०१८ रोजी सकाळी पोलीस मुख्यालय,परेड ग्राऊंड शिवाजीनगर पुणे येथे भारताच्या प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम असल्याने सदर कार्यक्रमास येणा-या नागरीकांना त्यांची वाहने पार्क करण्यासाठी कृषी महाविद्यालय येथील ग्राऊंड उपलब्ध केले आहे त्या ग्राऊंडवर आपली वाहने पार्क करावी. तरी सदर बाबत नागरीकांनी/वाहनचालकांनी त्याबाबत माहिती घेऊन वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे ही विनंती.